# कार्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,गडचिरोली.

## क्रमांक स.अ.(बांध)/वॉ.क्यु./१६६८/२०२६, दिनांक ३० /०६/२०२६.

## निवीदा/दरपत्रक सुचना

याव्दारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय,गडचिरोली मुख्यालयातील व तालुका न्यायालयातील जलशितक यंत्रे व जलशुध्दीकरण यंत्राचा खालीलप्रमाणे देखभाल व दुरुस्ती व सुटेभागाचा सेवासंविदा करार करावयाचा आहे. करीता सेवासंविदा करार करण्यास तयार असणा-या अधिकृत एजेन्सीकडून त्यांची दराबाबतची सिलबंद निवीदा दिनांक ०६/०७/२०२६ ला सांयकाळी ५.३० वाजेपर्यन्त जिल्हा न्यायालय,गडचिरोली येथे सादर करावी.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | जलशितक यंत्रे कंपनी | जलशुध्दीकरण यंत्राची कंपनी | जलशितक यंत्राची संख्या | जलशुध्दी करण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायालय, गडचिरोली | Blue Star | Blue Baily | 05 | 05 |
| | | Usha | Aqua | 01 | 01 |
| २ | दिवाणी व फौजदारी न्यायालय,आरमोरी | Voltas | Kent | 02 | 02 |
| ३ | दिवाणी व फौजदारी न्यायालय, देसाईगंज | Blue Star | Blue Baily | 01 | 01 |
| | | Usha | Aqua | 01 | 01 |
| ४ | दिवाणी व फौजदारी न्यायालय, कुरखेडा | Blue Star | Blue Baily Commercial | 01 | 01 |
| | | Usha | Marlin Commercial | 01 | 01 |
| ५ | दिवाणी व फौजदारी न्यायालय, धानोरा | Blue Star | Blue Baily Commercial | 01 | 01 |
| ६ | दिवाणी व फौजदारी न्यायालय, चामोर्शी | Blue Star | Blue Baily Commercial | 01 | 01 |
| | | Usha | Aqua | 01 | 01 |
| ७ | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहेरी | Usha | Aqua | 01 | 01 |
| ८ | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिरोंचा | Voltas | Aqua Natural | 01 | 01 |
| | | Usha | Aqua Natural | 01 | 01 |
| ९ | मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांचे निवासस्थान(प्राणहिता) | Kent | -- | -- | 01 |
| | एकूण | | | 18 | 19 |

**विहीत अटी व शर्ती** :-

१) सेवासंविदा करारामध्ये प्रत्येक महिण्यात एक वेळेस यंत्राची साफसफाई व देखभाल करुन देणे अनिवार्य राहील. सेवासंविदा करारामध्ये यंत्रामधील सर्व प्रकारचे सुटे भाग व्यवस्थीतपणे कार्य करीत नसल्यास बदलवून देणे आवश्यक राहील. व यंत्रामध्ये सुटे भाग लावल्याबाबत संबंधीत विभागाचे व न्यायालयाचे सहायक अधिक्षक यांना दाखवून व जुने साहित्य त्यांचेकडे जमा करुन सविस्तरपणे अहवाल तयार करण्यात यावा व त्यावर संबंधीताची स्वाक्षरी घेवून जिल्हा न्यायालयास देयक सादर करताक्षणी सोबत सादर करणे अनिवार्य राहील.

२) निवीदेमधील दर दुरुस्तीकरीता प्रत्येक जलशितक व जल शुध्दीकरण यंत्राचे दोनही मिळून एकत्रित निवीदेमध्ये नमूद करणे आवश्यक आहे. आणि सुटे भागाचे दर स्वतंत्रपणे नमूद करणे आवश्यक आहे. जेणेकरुन रक्कमेचे प्रदान दर तिन महिण्यानी करतानी सुलभ होईल.

..२..

३) निवीदेमधील प्रत्येक साहित्यांचे दर सर्व करासहीत असणे आवश्यक. तशाप्रकारे निविदेमध्ये स्पष्टपणे नमुद करावे.

४) दर तिन महिण्यानी सेवा संविदा कराराची रक्कम प्रदान करण्यात येईल.

५) कोणत्याही प्रकारचे आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाहीत.

६) यंत्रे नादुरुस्त असल्याबाबत गडचिरोली मुख्यालयाकडून किंबहुना तालुका स्तरावरील न्यायालयाकडून सुचना मिळताच २४ तासाचे आंत दुरुस्त करणे अनिवार्य राहील.

७) त्याचप्रमाणे सुट्टीचे दिवशी आवश्यकता पडल्यास व सुचना मिळाल्यास त्वरीत यंत्रे दुरुस्त करणे बंधनकारक राहील.

८) जलशुध्दीकरण व जलशितक यंत्राला लावण्यात येणारे साहित्य हे उत्तम दर्जाचे व आयएसआय मार्क चिन्हांकिंत असणे आवश्यक.

९) जलशुध्दीकरण व जलशितक सयंत्राला लावण्यात येणा-या साहित्यांचा गॅरन्टी/ वॉरन्टी कालावधी नमूद करणे अनिवार्य राहील. व तसे निवीदेमध्ये प्रत्येक साहित्यासमोर गॅरन्टी /वॉरन्टी कालावधी नमूद करणे आवश्यक.

१०) गॅरन्टी/वॉरन्टी कालावधीत लावण्यात आलेले साहित्य बंद पडल्यास नविन लावून देणे अनिवार्य राहील. त्यासाठी वेगळे शुल्क देण्यात येणार नाही.

११) निवीदा सादर करणा-या प्रतिष्ठानाने जलशुध्दीकरण व जलशितक सयंत्र दुरुस्तीच्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

आदेशान्वये

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय,गडचिरोली.

टेंडर नोटीसची प्रत बेलिफामार्फत जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय,गडचिरोली.